# प्रकरण पाचवे

## श्रीज्ञानदेव आणि श्रीगुरुनिवृत्तिनाथ

# प्रकरण पाचवे

## श्रीज्ञानदेव आणि श्रीगुरु निवृत्तिनाथ

### श्री ज्ञानदेव

साहित्यिक व्यक्तिमत्व आणि साहित्यिक कलाकृती यांचा अनोन्यसंबंध असतो. साहित्यिक कलाकृतीमधून साहित्यिकाचे व्यक्तिमत्व चित्रित झालेले असते. साहित्यिकाच्या मनपिंडावर ज्या साहित्यिक परंपरेचा संस्कार झालेला असतो ती साहित्यिक परंपराही लेखनातून अभिव्यक्त होते. ज्ञानेश्वर हे नाथ संप्रदायातील निवृत्तिनाथांचे शिष्य आहेत, यामुळे ज्ञानेश्वरांनी नाथसंप्रदायाला व प्राचीन लेखन परंपरेला अनुसरून गुरुभक्ती, गुरुमहात्म्य याविषयीचे विचार ज्ञानेश्वरीत व्यक्त केलेले आहेत. हा विचार व्यक्त करीत असतानाही ज्ञानेश्वरांमधील काव्यात्मक वृत्ती उफाळून आल्याने गुरुविषयीचा प्रेमभाव उत्कटपणे व्यक्त झालेला आहे. गुरुविषयी अंत्यतिक निष्ठा बाळगणारा, गुरुविषयी आदरभाव बाळगून ज्ञानग्रहण करणारा व गुरुच्या साक्षीने ज्ञानाचे दान करणारा एक आदर्शशिष्य म्हणून ज्ञानदेवांचे चित्र निर्माण झालेले आहे.

ज्ञानेश्वरांच्या व्यक्तिमत्वातील कोमलता, सजगता, निरागसता, लीनता, विनय वृत्तीचा हळूवारपणा इत्यादी गुण निरूपणाच्या ओघात व्यक्त झालेले आहेत. ज्ञानेश्वरांचा तत्वज्ञकवी असा उल्लेख करतात. तत्वज्ञ व कवी असा सुंदर समन्वय ज्ञानदेवांच्या व्यक्तिमत्वात झालेला आहे असे व्यक्तिमत्व जन्मास येणे हा मणिकांचन योग असतो. डॉ.ल.रा.नसिराबादकर म्हणतात ते अगदी बरोबर आहे की ज्ञानेश्वरीत काव्य कुठे सुरु होते आणि तत्वज्ञान कुठे संपते ते कळत नाही ज्ञानेश्वरांसारखा तत्वज्ञकवी महाराष्ट्राच्या भूमीत जन्मला आणि मराठी भाषा व महाराष्ट्राची अस्मिता चिरंतन करुन अजरामर झाला. ज्ञानेश्वरांचे व्यक्तिमत्व ज्ञानेश्वरीत साकार झालेले आहे त्याचा मागोवा पुढीलप्रमाणे घेतलेला आहे.

ज्ञानेश्वरांचे सुसंस्कृत व्यक्तिमत्व --

परमेश्वरी शक्तीला मनोभावे शरण जाऊन पूजन करण्याच्या एका प्राचीन परंपरेला अनुसरून ज्ञानेश्वर परमेश्वरी शक्तीचे मंगलाचरणाने पूजन करतात. पूर्वापार चालत आलेल्या चांगल्या परंपराना समृध्द करण्याचे कार्य साहित्यिक करीत असतात. ज्ञानेश्वरांच्या सुसंस्कृत व्यक्तिमत्वाचे प्रगत्भ असे दर्शन मंगलाचरणामध्ये घडते. ज्ञानदेवांच्या मंगलाचरणानी मंगलाचरणाची परंपरा समृध्द केलेली आहे. ज्ञानदेवांची मंगलाचरणे संशोधनाचा विषय ठरावा हे या मंगलाचरणाचे खास वैशिष्टय आहे. ज्ञानदेवांच्या परिपूर्ण व्यक्तिमत्वाची स्पंदने या मंगलाचरणापासून सुरु होतात. ज्ञानदेवीच्या मंगलाचरणापासून तहत ज्ञानदेवीच्या समाप्तीपर्यन्त ज्ञानदेवांनी ज्ञानदेवीची केलेली रचना अभूतपूर्व आहे. प्रास्ताविक, हेतूकथन, विषयप्रतिपादन, संकलन व उपयोजन या शिक्षणशास्त्रातील पाच पायऱ्याच्या सुंदर उपयोजनाचा आदर्श नमुना या ग्रंथात पहावयासमिळतो. आपल्या अध्यापनाकडे विद्यार्थ्यांचे लक्ष आकर्षित करुन सुयोग्य अशा ज्ञानाचा संस्कार कसा याचा आदर्शपाठ ज्ञानदेवानी घालून दिलेला आहे.

ज्ञानदेवांच्या नवोन्मेषशाली प्रतिभेचा कलात्मक असा आविष्कार म्हणजे मंगलाचरणे होत. मंगलाचरणाची व गीतामावार्थाची सुरुवात तीन अशा महानशक्तींना वंदन करुन करतात. हे विश्व ज्या शक्तीमुळे आकारास आलेले आहे त्या ओंकारस्वरूप आदिबीजाला नमस्कार करतात --

ते तीन्ही एकवटले । तेथ शब्दब्रह्म कवळले ।
ते मिया श्रीगुरुकृपा नमिले । आदिबीज ।। ( १।२० )

अकार, उकार व मकार हे ज्या वेळेस एकत्र होतात त्यावेळेस त्यात शब्दब्रह्माचा वेदांचा समावेश होऊन ॐकार बनतो त्या ओंकाररूप आदिबीजाला ज्ञानेश्वर निवृत्तिनाथांच्या कृपेने प्रथम नमस्कार करतात.

अपूर्व अशा वाणीच्या ठिकाणी विलास करणारी चातुर्य, अर्थ व कला याची स्वामिणी आणि विश्वाला मोहित करणारी अशी जी सरस्वती तिला नमस्कार करतात व ज्यांच्या कृपेने भावार्थदीपिका प्रज्वलीत झाली त्या सद्गुरू निवृत्तिनाथाना नमस्कार करताना ज्ञानदेवांची वाणी अर्थ,काव्य,भावना व विचार यांनी बहरून आलेली आहे --

मज हृदयी सदगुरू । जेणे तारिलो हा संसारपुरु ।
म्हणौनि विशेषे अत्यादरु । विवेकावरी
तैसा पुढत पुढती तोचि । मिया अभिवंदिला श्रीगुरू ।
जो अभिलषित मनीरुचि । पुरविता तो ( १।२२ २७ )

ज्ञानदेवांनी केलेले मंगलाचरण वस्तुरूप व नमस्काररूप आहे. या नमस्कारातच चमत्कार आहे. ज्ञानदेवांचे व्यक्तिमत्व अलौकिक आहे ते या अर्थाने की लौकिकाना जे सुचत नाही ते त्यांना सुचवलेले आहे. झाडांच्या मुळांना पाणी घातल्यास ते पानापानांपर्यन्त पोचते परंतु झाडाच्या शेंड्यावर पाणी ओतल्याने पानाना टवटवी येत नाही . निसर्गातील या ज्ञानाचा उपयोग मगलाचरणामध्ये केलेली आहे. जगतरूपी झाडाच्या ओंकाररूप आदिबीजाला प्रथम नमस्कार करतात. या बीजापासून आकारास आलेल्या झाडाला बोलते करणाऱ्या सरस्वतीला दुसरा नमस्कार करतात, आणि या झाडाची योग्य दिशेने वाढ करण्यास मदत करणाऱ्या व ते झाड फळाफुलांनी बहरण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करणाऱ्या सदगुरूना नमस्कार करतात. विश्वव्यापक शक्तींना एकत्र आणण्यात ज्ञानदेवांच्या विश्वात्मक व्यक्तित्वाचे दर्शन घडते.

अभिजात नम्रता --

मंगलाचरणानंतर ज्ञानदेव श्रोतृवृंदाकडे वळतात,श्रोता व वक्ता यांच्यातील परस्परावलंबी संबंधाचे सुंदर असे दर्शन या ठिकाणी घडते.आपण म्हणजे महापंडित व आपले व्याख्यान ऐकण्यासाठी आलेले श्रोते म्हणजे नंदीबैल असा अभिनिवेश येथे नाही. ज्ञानदेवांसारखा सर्वज्ञ वक्ता याठिकाणी श्रोत्यांच्या चरणाशी

लडिवाळपणाची विनंती करीत आहे असे दुर्मिळ चित्र या ठिकाणी पहावयास मिळते.

श्रोत्यांना अर्जुनाची व आईवडिलांची योग्यता देऊन आपल्याकडे लहानपण घेण्यामध्ये ज्ञानदेवांची नम्रता अधिक खुलून आलेली आहे. आपल्या श्रोत्यांविषयी व गीतार्थाविषयी ज्ञानदेव म्हणतात --

हे सतजी म्या म्हणितले । चरणा लागोनि विनविले ।
प्रभू सखोल हृदय आपुले । म्हणौनिया ।
जैसा स्वभावो मायबापांचा । अपत्य बोले जरी बोबडी वाचा ।
तरी अधिकचि तयाचा । संतोष आथी
तैसा तुम्ही मी अंगिकारला । सज्जनी आपुला म्हणितला ।
तरी उणे सहजे उपसाहला । प्रार्थू कायी ।।
परि अपराधु तो आणिक आहे । जे मी गीतार्थ कवळू पाहे ।
ते अवधारा विनवू लाहे । म्हणौनिया । (१।६३ ते ६६ )

ज्ञानेश्वरांच्या ठिकाणी जी अभिजात नम्रता वास करत होती तद्‌विषयी निर्मलकुमार फडकुले म्हणतात ` सर्व प्रथम ज्ञानेश्वरांची अभिजात नम्रता आणि सुसंस्कृतता याचे दर्शन आपल्याला प्रभावित करते. श्रेष्ठ आध्यात्मविचार विवरुन सांगणाऱ्या प्रज्ञावंताची वृत्ती शालीन असावी ही अपेक्षा असते, पण अनुभव असा येतो की, पांडित्याला अनेक वेळा अहंकाराने वेढलेले असते. आपण सांगतो ते अंतिम सत्य आहे, त्याला कोणीही आव्हान देऊ शकत नाही, अशा आठयतेने कित्येक पंडित बोलत असतात. ज्ञानेश्वर मात्र विनयाच्या पातळीवरुन कधीही खाली उतरत नाहीत. अहंकाराचा वारा न लागलेल्या या पंडित कवीच्या अभिजात विनयानेच वाचक स्तिमित होतो, जिंकला जातो, ज्ञानेश्वरांचे भाष्य तो मनापासून ऐकू लागतो. विनीत हा ज्ञानेश्वरांचा स्वाभाविक गुणधर्म आहे.` [१]

मराठी भाषेबद्दलचा अभिमान --

ज्ञानदेवांच्या ठिकाणी मराठी भाषेबद्दल जो पराकोटीचा अभिमान आहे तो ज्ञानेश्वरीत अनेक ठिकाणी व्यक्त झालेला आहे. अमृत हे मेलेल्यांना जीवंत करते

अमृत प्राशन केल्यानंतर मरण येत नाही. अमरत्व प्राप्त होते अशा अमृताशी मराठी भाषा पैज जिंकेल असा आत्मविश्वास ज्ञानदेवांनी व्यक्त केलेला आहे. मृत्यू लोकात अमृत प्राशन केलेली व्यक्ती सापडणे अशक्य त्यामुळे अमृत ही कवी कल्पना आहे. ज्ञानेश्वरीमात्र सातशेवर्षे होऊन गेली तरी मराठी मनाला संजीवन देत आलेली आहे. ज्ञानेश्वरीतील ज्ञानामृत प्राशनाने अनेकांची जीवने उजळून निघालेली आहेत.

मराठी भाषेचे ज्ञानेश्वरीतील सामर्थ्य सूर्यासारखे तेजस्वी व सर्व व्यापक आहे. सूर्याचे बचके एवढे दिसणारे बिंब सर्व असमत प्रकाशित करते.

जैसे बिंब तरी बचके एवढे । परि प्रकाशा त्रैलोक्य थोकडे ।(४/२१४

त्याप्रमाणे मराठी भाषेचे बोल व्यापक आहेत. अर्थभरित,इतर भाषेच्या तुलनेने काव्यसंपन्न आहेत. भाविकांची अध्यात्म भूक भागविल्याचे व साहित्याचा आस्वाद घेणाऱ्या अस्वादकाची साहित्यिक भूक भागविण्याचे सामर्थ्य ज्ञानेश्वरीच्या रूपाने आविष्कृत झालेल्या मराठी भाषेत आहे.

जेथ साहित्य आणि शांति । हे रेखा दिसती बोलकी ।
जैशी लावण्यगुणावती । आणि पतिव्रता ( ४ । २१७ )

मराठी भाषा व संस्कृत भाषा याची तुलना करून कोणतेही भाषा श्रेष्ठ व कनिष्ठ नसते. श्रेष्ठ व कनिष्ठ हे आपल्या कमकुवत मनाचे विशेषण आहेत. मराठी भाषा सुंदर आहे. मराठी भाषेत निर्माण झालेल्या ओव्या अलंकारमय आहेत.या ओव्या साहित्यशास्त्राच्या अलंकार ठराव्यात इतक्या त्या वैभवसंपन्न आहेत.

देशिचियेनि नागरपणे । शांतु श्रृंगाराते जिणे ।
तरि वोवियां होती लेणे । साहित्यासि
मूळ ग्रंथीचिया संस्कृता । वरि म-हाटी नीट पढता ।
अभिप्राय मानलिया उचिता । क्वणभूमी हे न चोजवे ।।
जैसे अंगाचेनि सुंदरपणे । लेणिया अंगाचि होय लेणे ।।

तेथ अलंकारिते कवण कवणे । हें निर्वेचेना ॥
तैसी देशी आणि संस्कृतवाणी । एका भावार्थाच्या सुखासनी ।
शोभती आयणी । चोखट आइका ॥
उठावलिया भावा रूप । करिता रसवृत्तीचे लागे वडप ।
चातुर्य म्हणे पडप । जोडले आम्हा ॥
तैसे देशियेचे लावण्य । हिरोनि आणिले तारूण्य ।
मग रचिले अगण्य । गीतातत्व ( १० । ४२ ते ४७ )

ज्ञानेश्वर भाषेच्या सामर्थ्याविषयी द्वैतभाव मानत नाहीत. मराठी भाषा व संस्कृतभाषा गीतेचा भावार्थ सांगावयास समान योग्यतेच्या आहेत. देशी व संस्कृत भाषा एका भावार्थाच्या सुखासनी म्हणजे समान योग्यतेच्या आहेत .निर्मळ अंतकरणाने भावार्थ ऐकल्यास या म्हणण्याची प्रचीती येईल. संस्कृत भाषेचा वृथा अभिमान बाळगणाऱ्याचा फोलपणा या ठिकाणी पटवून दिलेला आहे.

ज्ञानेश्वरांचे अतृप्त मातृप्रेम --

अर्जुनावर श्रीकृष्णाची जी कृपादृष्टी झालेली आहे त्या कृपादृष्टीचे ज्ञानदेवांनी काव्यात्मक असे वर्णन केलेले आहे --

आधीचि चित मायेचे । वरी मिष जाहले पढियंतयाचे ।
आता ते अद्भूतपण स्नेहाचे । कवण जाणे ।।
ते म्हणो कारुण्यरसाची वृष्टि । की नवया स्नेहाची सृष्टि ।
हे असो नेणिजे दृष्टी । हरीची वानू ।
जे अमृताची वोतली । की प्रेमाची पिऊनि मातली ।
म्हणोनि अर्जुनमोहे गुंतली । निघो नेणे । (५।१७० ते ७२ )

आयुष्यभर झिजणे हा जिच्या जीवनाचा मंत्र असतो त्या आईच्या प्रेमातील अदभूतपणा हा पुरुषमंडळींना समजणार नाही. अगोदरच आईचे अंत:करण त्यातही आवडतेपणाचे निमित्त मग तो प्रेमाचा अदभूतपणा कोण जाणेल ? श्रीकृष्ण व अर्जुन

यांच्यातील प्रेमाचा अदभूतपणा व श्रीकृष्णाची प्रेमदृष्टी जिथे समजत नाही तिथे, आईच्या प्रेमाचा अनुभव कसा येईल ? आईच्या प्रेमाचा अनुभव येण्यासाठी आईचे प्रेम भर भरुन मिळायला हवे. ज्ञानेश्वरांना त्यांच्या आईचा अत्यल्प सहवास लाभलेला आहे हे जीवनचरित्रातून स्पष्ट झालेले आहे. ज्ञानेश्वरांचे अतृप्त मातृप्रेम अशा वर्णनातून व्यक्त होते.

ज्ञानेश्वर वात्सल्यभावनेचे भावनात्मक असे चित्रण करतात त्यामुळे करूण रसाची निर्मिती होते. अशा चित्रणातून ज्ञानदेवांच्या मनातील अतृप्त मातृप्रेम प्रकर्षाने जाणवते. प्रेमाचा वर्षाव करणारी अमृतात भिजलेली करुणरसाची वृष्टी अशी जी कृपादृष्टी ज्ञानदेवांना मिळालेली नाही. आनंदाचे आवार निर्माण करणाऱ्या ज्ञानदेवांच्या जीवनाला अतृप्त मातृप्रेमाची कारूण्याची झालर या ठिकाणी चित्रित झालेली आहे.

ज्ञानदेवांचा गुरू सामर्थ्यावरील अढळ विश्वास --

ज्ञानदेवांची गुरू भक्ती सर्वश्रेष्ठ आहे. ज्ञानदेवांचे गुरूसामर्थ्य सर्वश्रुत आहे. ज्ञानदेवांचा त्यांच्या गुरूसामर्थ्यावर अत्यंतिक विश्वास आहे. अध्यात्म प्रगतीची गुरूकिल्ली म्हणजे गुरूसामर्थ्यावरील दृढ विश्वास. ज्ञानदेवांच्या मनात आपल्या गुरूच्या सामर्थ्याविषयी कधीच शंका आलेली नाही. उलटपक्षी ज्ञानदेवांना गुरू - सामर्थ्याची प्रचीती अनेक वेळा आलेली आहे. गीताभाष्य करण्याचे सामर्थ्य ज्ञानदेवांच्यात नव्हते. अशी स्पष्ट कबूली ज्ञानदेवानी दिलेली आहे. परंतु निवृत्ति - नाथांनी आपले सामर्थ्य ज्ञानदेवाना देऊन त्यांच्याकडून गीतानिरूपणाचे कार्य पूर्ण करुन घेतले. आपले सामर्थ्य शिष्याला देऊन शिष्याला तात्काळ आपणासारखा करणारे निवृत्तिनाथ हे ज्ञानदेवाचे अध्यात्म गुरू होत. या गुरूसामर्थ्याच्या अढळ विश्वासावरच मी अशक्य ते शक्य करुन दाखवीन असे ज्ञानेश्वर म्हणतात. ज्ञानेश्वर म्हणतात की निवृत्तिनाथ फक्त नेत्रकटाक्षाने पुढील गोष्टी घडवू शकतात --

ते बुध्दीही आकळिता साकडे । म्हणौनि बोली विपाये सापडे ।
परि निवृत्तिकृपादीप उजियेडे । देखेन मी
तेणे कारणे मी बोलेन । बोली अरूपाचे रूप दावीन ।
अतींद्रिय वरी भोगवीन । इंद्रियाकरवी ( ६। ३२, ३६ )

ज्ञानदेवांचा वक्तृत्व गुण --

ज्ञानेश्वर हे अंत:करणापासून बोध करणारे महनीय वक्ते आहेत. वक्ताच्या ठिकाणी हवी असणारी नम्रता, सहृदयता वाणीचा रसाळपणा, साहित्यिक व्यासंग, चौफेर वाचन इ. सर्व गुणवैशिष्ट्य ज्ञानेश्वरांच्या ठिकाणी होती. श्रोते हे वक्त्यांचे मायबाप असतात अशी ज्ञानदेवांची धारणा होती. ज्ञानेश्वर जो विचार व्यक्त करीत होते तो विचार हळूवारपणे श्रोत्यांच्या चित्तात ठसावा असे ज्ञानदेवाना मनोमन वाटत असे. श्रोत्यांनी आपल्या व्याख्यानाकडे आकर्षित व्हावे यासाठी वक्त्याला अनेकविध युक्त्या कराव्या लागतात. ज्ञानेश्वर याही गोष्टींचा वापर करतात. श्रोत्यांनी वक्त्याच्या बोलण्याकडे अवधान दिल्यास वक्त्याच्या वक्तेपणाला बहर येतो.

सहजे तरी अवधारा । वक्तृत्वा अवधावाचा होय चारा ।
तरी दोंदे पेलती अक्षरा । प्रमेयाची
अर्थ बोलाची वाट पाहे । तेथ अभिप्रावोचि अभिप्रायाते विये ।
भावाचा फुलौरा होत जाये । मतिवरी ( ९ । २७ -- २८ )

परंतु श्रोता जर द्विधा मन:स्थितीत असेल तर व्याख्यानाला आलेल्या रंगाचा बेरंग होईल. श्रोतृत्वावर वक्तृत्व आवलंबून असते. ज्ञानेश्वर श्रोत्यांचे चित्त आपल्या निरूपणात आकर्षित करतात, तद्नंतर मुख्यविषयाचे प्रतिपादन करतात, यामुळे ज्ञानेश्वरीत ज्ञानदेवांच्या वक्तृत्व गुणाचा उत्कर्ष झालेला आहे. संपूर्ण ज्ञानेश्वरी ग्रंथ हाच ज्ञानदेवाच्या वक्तृत्व गुणाचा उत्कृष्ट नमुना आहे.

ज्ञानेश्वर आदर्श शिष्य --

ज्ञानेश्वर हे आदर्श शिष्य आहेत. आदर्श शिष्याच्या अंगी असावे लागणारे आवश्यक गुण ज्ञानदेवांच्या ठिकाणी आहेत हे त्यांच्या गुरूमहात्म्याच्या वर्णनातून निदर्शनास येते. गुरूविषयी आदरभाव, एकनिष्ठ गुरुभक्ती, गुरूच्या सामर्थ्यावर पूर्ण विश्वास, अध्ययन करण्याचा ध्यास, अत्यंतिक नम्रता, जिज्ञासूवृत्ती व गुरूकृपाशीर्वादाने सर्व कार्य सिध्दीस जाईल याविषयीचा आत्मविश्वास त्यांच्या ठिकाणी आहे --

ज्ञानदेवाच्या मनात असणारी गुरभक्तीची तळमळ आणि ओढ त्यांच्या गुरूस्तवनात चित्रित झालेली आहे. आपल्या गुरुची रुपकात्मक शब्दपूजा बांधताना ज्ञानेश्वर म्हणतात --

आता हृदय हे आपले । चौफाळूनिया भले ।
वरी बैसवू पाऊले । श्रीगुरूंची
येवढे एक चोभग । वळधे वाचेचे अंग ।
श्रीगुरूपादपदमपराग । लाहे जे का ( १५ । १, १७ )

आपल्या गुरूची चरणसेवा कशी करावी याविषयी ज्ञानदेवानी रूपकात्मक वर्णन केलेले आहे की आपले हृदयरूपी चौरंग चांगला स्वच्छ करुन त्यावर श्रीगुरूच्या पादुकाची स्थापना करू. त्यांजविषयीच्या ऐका भावनारूपी ओंजळीत सर्वेंद्रियरूप पुष्पकलिका भरून त्यांनी त्यांच्या चरणाला अर्घ्य देऊ, अनन्यभावरूप उदकाने स्नान घालून त्यांच्याविषयीच्या एकनिष्ठ वासनारूप चंदनाचे त्यांना अनामिकेने गंध लावू सोन्याची नुपरे करुन त्यांच्या सुकुमार चरणांना लेववू. प्रेमरूपी जोडवी करुन गुरूच्या अंगठयात घालू. अष्टसात्वीकभावाने फुललेले कमळ त्यांच्या चरणावर वाहू, अंहकाराचा धूप जाळून , सो हं बोधप्रकाशाने त्यांना ओवाळू व ऐक्यभावनेने त्यांना अलिंगन देऊ. गुरूसेवेचे ज्ञानदेवानी केलेले वर्णन ज्ञानदेवांच्या निरामय प्रेमाचे एकनिष्ठ भक्तीचे व निर्मळ अंत:करणाचे द्योतक आहे.

ज्ञानेश्वर आपल्या गुरूसेवेमध्ये गुरूमय होऊन जातात. ज्ञानदेवांच्या या गुरूभक्तीविषयी प्रा.सु.का.जोशी म्हणतात "गीतेच्या तेराव्या अध्यायातील सातव्या श्लोकातील 'आचार्योपासनम' या पदावर ज्ञानदेवांनी केलेली टीका म्हणजे गुरुची वाङ्मयीन पूजा. गुरूमूर्तीला ध्यानामृताचा अभिशेष करावा,जीवदशेचा धूप जाळावा,ज्ञानाचा दीप ओवाळावा सामरस्याचा नैवेद्य अर्पण करावा, गुरूसेवा करावी ,तन,मन,धन गुरूस अर्पावे ' --

इये शरीराची माती । मेळवीन तिये क्षिती ।
जेथ श्रीचरण उभे गती । श्रीगुरूचे ।'

इतका शिष्य गुरूमय होऊन जातो."[२]

ज्ञानदेवाची रसवृत्ती --

मराठी व संस्कृतभाषेच्या साहित्यशास्त्रातील रसउत्पत्तीविषयी ज्ञानदेवांची भूमिका ज्ञानदेवीत अनेक ठिकाणी व्यक्त झालेली आहे.शृंगाराला रसाचा राजा मानलेला आहे. ज्ञानदेवीत शृंगाराच्या डोक्यावर शांत रसाने पाय ठेवलेला आहे असे ज्ञानदेवानी म्हटलेले आहे. ज्ञानदेवीत शांतरस मुख्य रस आहे. शांत रसाच्या जोडीला इतर रसांची योजना ज्ञानदेवानी केलेली आहे.

रसनिष्पत्तीच्यादृष्टीने अकरावा अध्याय अत्यंत महत्वाचा आहे. नवरसांचा रसकल्लोळ या अध्यायात झालेला आहे. शांतरस व अदभूतरस प्रमुख आहेत. शांतरस व अदभूतरस यांच्या संयोगातून फुलले काव्य म्हणजे अकरावा अध्याय होय.नवरसांच्या मेळवणीतून अकरावा अध्याय एक रसतीर्थ बनलेला आहे. या रसतीर्थाचे ज्ञानदेवानी केलेले वर्णन ज्ञानदेवांच्या व्यक्तिमत्वातील अनुभवाच्या वेधकतेचे वैवध्यपूर्ण अनुभवाच्या तरलतेचे जीवनानुभवातील सूक्ष्म निरीक्षणाचे व ज्ञानदेवांच्या रसवृत्तीचे निदर्शक आहे. ज्ञानेश्वर म्हणतात --

जेथ शांताचिया घरा । अदभूत आला आहे पाहुणेरा ।
आणि येराही रसा पांतिकरा । जाहला मानू ।।
जेथ शांताद्भुत रोकडे । आणि येरा रसा पडप जोडे ।
हे अल्पचि परी उपडे । कैवल्य एथ ( ११ । २ , १२ )

या अध्यायात शांतरसाच्या घरी अदभूत पाहुणा आला असून इतर रसानाही पंक्तीचा लाभ मिळालेला आहे. वधुवराच्या लग्नामध्ये इतर पाहुण्याना जसे वस्त्रालंकारानी भूषित होऊन मिरवावयास सापडते त्याप्रमाणे इतररसानी मराठी भाषारूपी पालखी मेणे वगैरे मिरवावयास मिळाले आहेत. शांत व अदभूतरस एकत्र मिळाल्याने अकरावा अध्याय प्रयाग बनलेला असून गीतारूपी सरस्वती नदी या गुप्त आहे.

ज्ञानेश्वरांच्या संवेदनशील मनाने जीवनामध्ये जे अनुभव घेतले त्याचे तरल असे चित्रण ज्ञानदेवीत केलेले आहे. एकापेक्षा अनेक नद्या ज्या ठिकाणी एकत्र येतात ते ठिकाण प्रयागतीर्थ बनते अशा नद्यांच्या संगमात एक नदी गुप्त असते आणि ती म्हणजे सरस्वती . ज्ञानेश्वरांनी या ज्ञानाचा कलापूर्ण उपयोग अकराव्या अध्यायात केलेला आहे. शांत व अदभूत रसाच्या संगमात गीतारूपी सरस्वती नदी गुप्त आहे.

माजी गीता सरस्वती गुप्त । आणि दोनी रस ते ओघ मूर्त ।
यालागी त्रिवेणी हे उचित । फावली बापा । (११ ।७ )

ज्ञानेश्वरांच्या सूक्ष्मनिरीक्षणशक्तीने जे अनुभव ग्रहण केले त्यांना प्रतिमेचा स्पर्श झाल्याने त्या अनुभवाना कलात्मक असे रूप प्राप्त झालेले आहे. कलात्मक रूप प्राप्त झालेल्या अनेक अनुभवसंघटना ज्ञानेश्वरीत विखुरलेल्या आहेत. ज्ञानेश्वरांच्या रसवृत्तीला पुरेसा अवसर अशा चित्रणामध्ये मिळाल्याने ज्ञानेश्वरीत काव्य अवतरलेले आहे. श्रीकृष्णाच्या परस्पर प्रेम संबंधाचे चित्रण करतेसमयी ज्ञानेश्वर दूध काढते समयी लाथा मारणारी गाय कासेला वासरू लावताच शांत होते किंवा पान्हा चोरणारी गाय वासरू पाहताच खडबडून उठते. या जीवनातील अनुभवाचे कलात्मक असे चित्रण करतात त्यामुळे वात्सल्य भावनेची निर्मिती होते. ज्ञानेश्वरांच्या ठिकाणी असणाऱ्या रसवृत्तीला अशा चित्रणामध्ये पुरेसा अवसर प्राप्त होतो.त्यामुळे तत्वज्ञानाच्या जमिनीत काव्याचा मळा फुललेला आहे --

ज्ञानेश्वरांच्या रसवृत्तीला सूक्ष्म निरीक्षणाची देणगी लाभल्याने जीवनातील साध्या अनुभवातूनही रसोत्कर्ष साधलेला आहे. ज्ञानेश्वर म्हणतात --

अहो वासरू देखिलियाचियेसाठी । धेनु खडबडोनि ओहे उठी ।
मग स्तनामुखाचिये भेटी । काय पान्हा धरे ॥
पाहा पा तया पांडवाचेनि नावे । जो कृष्ण रानींही प्रतिपाळू धावे ।
तयाते अर्जुन ऐसे पुसावे । तव साहील काई ॥
तो सहजेचि स्नेहाचे अवतरण । आणि येणे स्नेहा घातले आहे माजवण ।
ऐसिये मिळवणी वेगळेपण । उरे हेचि बहु ( ११ । ४० ते ४२ )

गाय आणि वासरू यांच्यातील अनावर प्रेमाच्या सहाय्याने श्रीकृष्ण व अर्जुन यांच्यातील अतुट अद्वैत प्रेमाचे दर्शन ज्ञानदेवानी घडविलेले आहे.

ज्ञानेश्वरांचे काव्यात्म व्यक्तिमत्व --

ज्ञानश्वरांचा उल्लेख तत्वज्ञकवी असा करतात. ज्ञानेश्वरीमध्ये काव्यनिर्मितीस ज्या क्षणी अवसर मिळेल त्या क्षणी ज्ञानदेवाचा कवी जागृत झालेला आहे. ज्ञानेश्वरीमध्ये अनेक ठिकाणी काव्यमय चित्रणाचे नमुने पहावयास मिळतात. उत्तुंग कल्पना-शक्तीचा कवी आपल्या कल्पनाशक्तीने भूतकाळात होऊन गेलेल्या व्यक्ति -रेखाना समूर्त करतो. या व्यक्तीरेखा समूर्त होताना ठोकळेवजा होत नाहीत. कुरुक्षेत्रावर श्रीकृष्णाच्या भाषणाने अर्जुनाच्या मनात निर्माण झालेल्या भावउर्मींना टिपताना ज्ञानदेवाचे काव्यात्म व्यक्तित्व बहरून आलेले आहे. श्रीकृष्णाच्या विश्वरूप दर्शनाने अंतर्बाह्य बदलेल्या अर्जुनाचे ज्ञानेश्वर काव्यात्म चित्रण करतात --

वार्षिये प्रथमदशे । बोहळल्या शैलांचे सर्वांग जैसे ।
विरुठे कोमलांकुरी तैसे । रोमांच झाले ॥
माजी सापडलेनि अलिकुळे। जळावरी कमळकलिका जेवी आंदोळे ।
तेवी आतुलिया सुखोर्मीचेनि बळे। बाहेरि कापे ॥
तेथ बैसला होता जियासवा । तियाचियाकडे मस्तक खालविला देवा ।
मग जोडुनि करसंपुट बरवा । बोलतु असे ( ११ । २४७,२४९ २५४ )

विश्वरूपदर्शनाने अंतर्यामी झालेल्या आनंदाच्या लाटानी अर्जुन डोलायला लागतो. हा ज्ञानदेवांच्या काव्यात्मक व्यक्तिमत्वाचा काव्यात्म आविष्कार आहे. अर्जुनाच्या या संबंध व्यक्तिचित्रणातून ज्ञानदेवांचे काव्यात्म व्यक्तिमत्व प्रतिबिंबित झालेले आहे.

मानवतावादी ज्ञानेश्वर --

ज्ञानेश्वरांची मानवतावादी भूमिका निरूपणाच्या ओघात स्पष्ट झालेली आहे. ज्ञानेश्वरांच्या व्यक्तिमत्वातील मानवता, समता, विश्वबंधुता यांचे दर्शन ठळकपणे झालेले आहे. व्यक्ती व्यक्तीमधील परस्पर संबंध माणुसकीच्या धाग्यांनी दृढ होतात. दिवसेंदिवस हा माणूसकीचा धागा कमकूवत होत चाललेला आहे. ज्ञानेश्वरकालीन समाज माणूसकीचे बंध तोडून पशुवृत्तीकडे झुकला होता. माणूसकीची शिकवण तत्कालीन समाजाला शिकविणे गरजेचे होते. स्वत: पवित्र वागून समाजाला सन्मार्ग दाखविण्याची क्षमता ज्ञानदेवांच्या ठिकाणी होती. अधर्माच्या चिखलात रुतलेला समाज स्वधर्माच्या रस्त्यावर आणण्याचा प्रयत्न ज्ञानदेवानी केलेला आहे. सर्वाबरोबर सममाव ठेवणे, बंधुत्वाने वागणे, कोणावरही अन्याय न करणे या बरोबरच आपल्यातील सद्गुणाने दुसऱ्यातील अवगुण कमी करुन चांगला माणूस निर्माण करणे याकडे ज्ञानदेवांचा कटाक्ष आहे ते म्हणतात --

का चिखली रुतली गाये । धडमाकड न पाहे ।
जो जियेचिया ग्लानी होये । कालापुला
तैसे आपुलेनि गुणे । पुढिलाचे उणे ।
फेडूनिया पाहणे । तयाकडे ( १६। १४२, १४९ )

पाण्याच्या प्रवाहात खोलगट माग आल्यास पाणी खोलगट माग मरुनच प्रवाहीत होते. ज्ञानदेवांच्या व्यक्तिमत्वातील उच्चप्रतीचा मानवतावाद या सारख्या वर्णनातून व्यक्त झालेला आहे.

ज्ञानदेवांचे व्यक्तिमत्व हे एक व्यासंगी व्यक्तिमत्व आहे. त्यांच्या वया -

विषयीचा वाद निरर्थक आहे, ते बावीस वर्षांचे होते की ऐंशीवर्षांचे होते हा वाद न संपणारा आहे. परंतु ज्ञानदेवांनी अनेक ग्रंथाची पारायणे केलेली असावीत असे त्यांच्या ग्रंथकर्तृत्वावरुन व ग्रंथातील अनेक उल्लेखावरुन म्हणता येते. प्रौढ विचारांचे प्रकटीकरण, निरूपणातील तारतम्य अनेक विषयाचे प्रतिपादन आणि स्पष्टीकरण, वाणीची रसाळता , उपमा , अलंकार यांची वेधकता व विविधता, साधेपणा व बुध्दीची भेदकता या सर्व वैशिष्टयांवरून ज्ञानदेवांचे व्यक्तिमत्व एका विचारवंताचे, व्यासंगी अभ्यासकाचे, सुबोधपणे तत्वप्रतिपादन करणाऱ्या तत्ववेत्याचे आणि आपल्या रसाळवाणीने श्रोत्यांना मंत्रमुग्ध करणाऱ्या लोकप्रिय वक्त्याचे आहे असे साधारणपणे सिध्द झालेले आहे.

श्री निवृत्तिनाथ --

प्रास्ताविक --

निवृत्तिनाथ हे ज्ञानदेवाचे वडिलबंधू आहेत. निवृत्तिनाथ हे ज्ञानदेवांचे अध्यात्म गुरू आहेत. निवृत्तिनाथ हे ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीच्या निरूपणाचे श्रोते आहेत. अध्यात्म क्षेत्रातील एक अधिकारी व्यक्ती म्हणून निवृत्तिनाथांचे सूचक असे दर्शन ज्ञानेश्वरीत घडते. ज्ञानेश्वरांचे निरूपण शांत व एकाग्रचित्ताने श्रवण करणारे निवृत्तिनाथ जेव्हा ज्ञानेश्वरांच्या निरूपणात विषयांतर होते तेव्हा त्यांना मुळ विषयाकडे वळवतात. विषयाचे प्रतिपादन पाल्हाळिकपणे होऊन श्रोत्यांचा रसभंग होण्याची चिन्हे दिसताचक्षणी ज्ञानेश्वरांना थांबवून भगवान श्रीकृष्ण काय म्हटले ते सांग अशी अज्ञा करतात. आवश्यक त्या ठिकाणी आपल्या शिष्याला मार्गदर्शन करुन शिष्याचा अध्यात्मक विकास साधणारे आदर्श गुरू म्हणून निवृत्तिनाथांचे व्यक्तिमत्व चित्रित झालेले आहे.

ज्ञानदेवांच्या अलौकिक प्रतिभा शक्तीचा आणि दैवीशक्तीचा उगम निवृत्तिनाथांच्या कृपाप्रसादात आहे. निवृत्तिनाथाचे हे ऋण ज्ञानदेवांनी मान्य केलेले

आहे. ज्ञानेश्वर म्हणतात मी मंदबुध्दीचा आहे परंतु निवृत्तिनाथांच्या कृपेने ज्ञान प्राप्ती झालेली आहे. या ज्ञानप्राप्तीच्या बळाने गीतेसारख्या गहन ग्रंथाचे भाष्य करणे शक्य झाले आहे.

परि एथ असे एकु आधारु । तेणेचि बोले मी सधरु ।
जे सानुकूळ श्रीगुरु । ज्ञानदेवो म्हणे
जयाते कामधेनू माये । तयासी अप्राप्य काही आहे ।
म्हणौनि मी प्रवर्तो लाहे । ग्रंथी इये ( १ । ७५, ७९ )

निवृत्तिनाथांच्या स्नेहाने ज्ञानदेवांचे अंत:करण उजळलेले आहे. निवृत्तिनाथानी आपले अध्यात्म ज्ञान आणि सामर्थ्य ज्ञानदेवाना देऊन ज्ञानदेवाना ज्ञानेश्वर केले. दगडातून मुर्ती घडवितो तो सृजनशील कलावंत असतो आणि घडविलेल्या मूर्तीला उजाळा देतो तो कारागीर असतो. परंतु कारागीर असूनही स्वत:ला सृजनशील कलावंत समजणाऱ्या लोकांना निवृत्तिनाथांनी आदर्शपाठ घालून दिलेला आहे तो असा की संपूर्ण जगाने ज्याचा आदर्श घ्यावा असा ज्ञानेश्वरांसारखा आदर्श शिष्य निर्माण करुन ,त्या शिष्यात आपले व्यक्तिमत्व विलीन करुन स्वत: निवृत्तिनाथ नामानिराळे राहिलेले आहेत.

ज्ञानदेवांसारखा आदर्श शिष्य निर्माण करुन जगताला चांगला जीवनादर्श देणारे सद्गुरू निवृत्तिनाथ हीच मानवरूपात अवतरलेली ईश्वरी सत्ता आहे. निवृत्तिनाथ हे ज्ञानदेवांचे अध्यात्म गुरू व वडिलबंधु होते तद्वत आईवडिलांच्या पश्चात आईवडिलाची उणीवा भासू न देणारे मायबाप होते. परब्रह्मस्वरूप गुरूविषयी ज्ञानेश्वर भरपूर बोलले आहेत. गुरूविषयीच्या अत्यंतिक प्रेमामुळे ज्ञानेश्वरांना काही वेळा गीताभाष्याचे भान राहत नाही. ते गुरूविषयीच बोलत राहतात आणि श्रोत्यांनी भान आणून दिल्यानंतर मुळपदावर येतात. तेराव्या अध्यायात याची प्रचिती येते. गुरू शिष्यातील हे एक अदभूत प्रेम आहे. संसार रुपी भवसागर पार करण्यास मदत करणाऱ्या गुरूकृपा व गुरूसामर्थ्य याविषयी ज्ञानेश्वर म्हणतात --

ते बुध्दीही आकळिता साकडे । म्हणौनि बोली विपायें सापडे ।
परि श्रीनिवृत्तिकृपादीप उजियेडे । देखैन मी ।।
येणे कारणे मी बोलेन । बोली अरूपाचे रूप दावीन ।
अतींद्रिय परी भोगवीन । इंद्रियाकरवी ( ६ । ३२, ; ३६ )

श्रीकृष्णाचे वर्णन करायला वेदही असमर्थ ठरलेले आहेत. त्या श्रीकृष्णाच्या मुखातून गीता निर्माण झालेली आहे. तेव्हा माझ्यासारख्या मंदबुध्दीच्या व्यक्तीने गीताभाष्य करणे अशक्य आहे. परंतु माझ्या गुरूसामर्थ्याने अशक्य असणारे काम शक्य करणार आहे. आपल्या गुरूसामर्थ्याविषयीचा विश्वास आत्मविश्वासपूर्वक सांगितलेला आहे. त्याबरोबर ज्ञानदेवांच्या व्यक्तिमत्वातील अभिजात नम्रता आणि गुरुविषयीचा सार्थ अभिमान सहजरित्या व्यक्त झालेला आहे.

ज्ञानदेवांच्या गुरूभक्तीला चित्रात्मक स्वरूप ज्ञानदेवीत प्राप्त झाल्याने निवृत्तिनाथांचे व्यक्तिचित्र ज्ञानदेवीत निर्माण झालेले आहे. निवृत्तिनाथांच्या या व्यक्तिचित्रास अभ्यास पुढीलप्रमाणे केलेला आहे .

इच्छित कामना पूर्ण करणारे श्री निवृत्तिनाथ --

ज्ञानदेवांनी व्यक्त केलेल्या इच्छा आणि अंतर्मनात असणाऱ्या अव्यक्त इच्छा निवृत्तिनाथाच्या कृपेने पूर्ण झालेल्या आहेत असे ज्ञानदेवीत ज्ञानदेवानी म्हटलेले आहे. ज्ञानेश्वरांच्या हृदयात वास करणाऱ्या मूळ सदगुरूंच्या कृपाशीर्वादाने ज्ञानेश्वर संसारमहापुरातून बाहेर पडले. संसार महापुरातून बाहेर पडल्यामुळेच त्यांना आध्यात्म विचाराची प्राप्ती झाली. ज्याप्रमाणे ( १/२२ते२४ ) जे डोळ्यात अंजन घातले म्हणजे त्याच्या दृष्टीस विशेष सामर्थ्य येऊन तो जिकडे पाहील तिकडे त्यास भूमिगत असलेल्या द्रव्याचा ठेवा दिसू लागतो. किंवा चिंतामणी हाती आल्यावर ज्याप्रमाणे मनात इच्छलेले सर्व हेतू पूर्ण होतात त्याप्रमाणे श्रीनिवृत्ति - - नाथांच्या कृपेने ज्ञानदेवांचे सर्व मनोरथ तडीस गेलेले आहेत. ज्ञानेश्वरानी हाती घेतलेले कार्य मनाप्रमाणे सफळ झाल्याने ज्ञानेश्वर सुखी झालेले आहेत

' येणे वरी ज्ञानदेवो । सुखिया झाला' असे ज्ञानदेवानी पसायदानामध्ये म्हटलेले आहे.

ज्ञानेश्वरांनी आपल्या गुरूचा उल्लेख मनोकामना पूर्ण करणारे असा केलेला आहे. म्हणजे निवृत्तिनाथ हे आपल्या शिष्याच्या इच्छित कामनापूर्ण करणारे सर्वश्रेष्ठ गुरू होते असे ज्ञानदेवानी वर्णन केलेल्या पुढील उल्लेखावरुन सिध्द होते --

तैसा पुढत पुढती तोचि । मिया अभिवंदिला श्रीगुरूचि ।
जो अभिलषित मनोरुचि । पुरविता तो ( १ । २७ )

कारुण्याची मूर्ती निवृत्ति माझा --

ज्ञानदेवानी आपल्या गुरूचे वर्णन करण्यासाठी अनेक विशेषणांची खैरात केलेली आहे. ज्ञानदेवांनी आपल्या गुरूला करुणासागर असे संबोधलेले आहे. ज्ञानेश्वर म्हणतात --

आईकें गा आर्तबंधू । निरंतरकारुण्यासिंधू ।
विशदविधावधू । वल्लभा जी ( १४ । ३ )

निवृत्तिनाथ ज्यांच्यावर करुणा करतात ,दया करतात त्यांच्या आयुष्याचा उध्दार होतो. निवृत्तिनाथ हे मायेच्या ममतेने ज्ञानदान करुन आपल्या शिष्याचा आत्मिक विकास करतात. ज्ञानेश्वर निवृत्तिनाथांच्या कृपादृष्टीचा आणि कारूण्याचा प्रताप वर्णन करतात.

अहो सदगुरूची कृपादृष्टी । तुझे कारूण्य जयाते
तो सकळ विद्यांचिये सृष्टी । धात्रा होय ( १२।९ )

गुरूमाऊली श्री निवृत्तिनाथ --

ज्ञानेश्वरीच्या बाराव्या अध्यायाच्या प्रारंभी ज्ञानदेवांनी माऊलीचे सांग व परिपूर्ण रूपक योजलेले आहे --

जयजय वो शुध्दे । उदारे प्रसिध्दे
अनवरत आनंदे । वर्षातिये
तू आपुलेनि स्नेह पल्लवे । माते पांधुरविशील सदैवे ।
तरी आताचि हे आधवे । निर्मिन माये ( १२ । १ - १७ )

निवृत्तिनाथ हे आईचे अंत:करण लाभलेले गुरु होते. प्रा.डॉ. वसंत स.जोशी म्हणतात "मात्यापित्याविना पोरकी झालेली ही मुले त्यांना निवृत्तिनाथ हेच त्यांच्याठिकाणी होते. अल्पवयात पडलेली ही जबाबदारी निवृत्तिनाथांनी तितक्याच समर्थपणे पेलली. तेच त्यांचे माता-पिता,गुरु-बंधु सर्व काही झाले. आपल्या भावंडाची लौकिक आणि अध्यात्मिक जीवने त्यांनी स्नेहाच्या आणि ज्ञानाच्या धाग्यांनी गुंफुण टाकले"[3] प्रेम आणि ज्ञान यांचा सुंदर समन्वय निवृत्तिनाथांच्या व्यक्तिमत्वामध्ये झालेला होता. म्हणून ज्ञानदेवांनी त्यांचा गुरुमाऊली असा उल्लेख केलेला आहे. ज्ञानेश्वर म्हणतात --

आधारशक्तीचिया अंकी । वाढविसी कौतुकी ।
हृदयाकाशपल्लकी । परिये देसी निजे
म्हणौनि साधका तू माऊली । पिके सारस्वत तुझिया पाउली ।
या कारणे मी साउली । न संडी तुझी ( १२ । ५ - ८ )

ज्ञानेश्वर निवृत्तिना साधकांची माता म्हणतात .ज्ञानेश्वर लहान होते तेव्हाच त्यांच्या आई-वडिलांनी देहान्त प्रायश्चित घेतलेले आहे. या दुर्दैवी घटनेमुळे ज्ञानदेवांना आईचे प्रेम मिळालेले नाही ते सुख देण्याचा प्रयत्न निवृत्तिनाथानी केलेला आहे म्हणून त्यांचा उल्लेख माऊली असा केलेला आहे.

श्रीनिवृत्तिनाथ हेच परब्रह्म --

निवृत्तिनाथ हेच परब्रह्म आहेत अशी ज्ञानदेवांची नितांत श्रध्दा आहे. निवृत्तिनाथ हीच परमेश्वरी शक्ती आहे अशी ज्ञानदेवांची धारणा आहे. निवृत्तिनाथाच्या गुरुमहात्म्याविषयी ज्ञानदेवानी दहाव्या अध्यायात विस्तृत वर्णन केलेले आहे. ज्ञानेश्वर आपल्या गुरुचे सामर्थ्य वर्णन अनेक उपमाअलंकारानी करतात.

ज्ञानेश्वर म्हणतात --

नमो विशदबोधविद्‌दा । विचारविंधप्रबोधा ।
परा प्रमेयप्रमदा । विलासिया ॥
ऐसे एकेक देवाचे करणे । ते अपार बोलो केवी मी जाणे ।
त-ही अनुवादलो धीटपणे । ते उपसाहिजे जी ( १० । १, 22 )

ज्ञानेश्वरांची जी श्रध्दा आहे की श्रीगुरूनिवृत्तिनाथ हे परब्रह्म आहेत. याविषयी प्रा. मु.का.जोशी लिहितात "ज्ञानेश्वरीत निरनिराळ्या अध्यायाच्या प्रारंभी ज्ञानदेवानी जगदखिलपालन, आराध्यलिंग, आत्मानुभवनरेंद्र, विश्वोदभवभुवन ( ज्ञाने. अ.१० ) समस्त सुरवर्य, आर्तबंधू, निरंतरकारूण्यसिंधू ( आ.अ.१४ ) निगमागम द्रुमफळ । फलप्रद ( ज्ञा.अ.१८ ) अशी सार्थ विशेषणे योजून त्यांनी श्रीगुरू हेच परब्रह्म होत ही दृढ श्रध्दा वारंवार आवर्जुन प्रकट केलेली आहे." [४]

श्रीनिवृत्तिनाथ चित्सूर्य --

ज्ञानदेवांनी निवृत्तिनाथांचा उल्लेख चित्सूर्य असा केलेला आहे. चित्सूर्य म्हणजे चैतन्यसूर्य, ज्ञानरूपी सूर्य, ज्ञानदेवांनी या चित्सूर्याची लौकिक सूर्याशी तुलना केलेली आहे. लौकिक सूर्यामुळे रात्र संपते, चांदण्या लुप्त होतात, कमळे उमलतात, त्यात अडकून पडलेले भ्रमर मुक्त होतात. विरहव्याकूळ चक्रवाकांचे पुनर्मीलन होते. एकूणच सारे वातावरण आनंदमय होते. लौकिक सूर्य जसजसा तापू लागतो तस तसा या वातावरणाचा विरस होतो. पृथ्वीच्या भ्रमण गतीमुळे काही भागावर परत रात्र होते. गुरूरूप चित्सूर्य अविधारूप रात्र नाहीसी करतो, ज्ञानाज्ञानांच्या चादण्याचा लोप करतो. ज्ञानीयांना आत्मबोधाचा सुदिन दाखवतो. हा चैतन्यरूपी सूर्य एकदा उगवला की शेवटपर्यन्त मावळत नाही. ज्ञानेश्वर म्हणतात --

न दिसणे दिसणेनसी मावळवी । दोही झाकिले ते सैध पालवी ।
काय बहु बोलो ते आधवी । उखाचि आणी ॥
तो अहोरात्रांचा पैलकडु । कोणे देखावा ज्ञानमार्तंडु ।
जो प्रकाश्येवीण सुखाडु । प्रकाशाच्या ॥
तया चित्सूर्या श्रीनिवृत्ती । आता नमो म्हणो पुढत पुढती ।
जे बाधका येईज तसे स्तुती । बोलाचिया ( १६ । १५ ते १७ )

निवृत्तिनाथाना चित्सूर्य संबोधन्यामागे निवृत्तिनाथांच्या जीवन चरित्राची पार्श्वभूमी आहे. लहान वयातच आई वडिलांच्या पश्चात भावंडांच्या पालनपोषणाची जबाबदारी पडली. मरीत मर म्हणून संन्याशाची संतती ही जननिंदेची मर पडली. असे असूनही या भावंडांची जीवने सर्वसामान्यासारखी नव्हती. अध्यात्मक्षेत्रात आश्चर्यजनक प्रगती झालेली होती. अध्यात्मज्ञान लोकांना सांगण्याचे काम सुरू होते. त्यामुळे सर्वत्र कौतुक होत होते. यामुळे तथाकथित धर्ममार्तंडाशी अप्रत्यक्षारीत्या युध्द सुरु होते. एवढी मोठी संकटे समोर असूनही निवृत्तिनाथांनी आपल्या स्नेहाने व अध्यात्मज्ञानाने आपल्या भावंडाची अंत:करण उजळून काढलीत.

निवृत्तिनाथांच्या व्यक्तिचित्रणावरुन असा निष्कर्ष निघतो की अध्यात्मक्षेत्र हे रिकामटेकड्यांचे क्षेत्र नसून येथे ये-यागबाळ्याचे काम नाही . येथे जातीचे म्हणजे प्रचंड असे धैर्य असते अशा धैर्यवान पुरुषाचे क्षेत्र आहे कारण येथे रात्रंदिवस युध्दाचा प्रसंग असतो. निवृत्तिनाथांना पावलो पावली युध्द करावे लागले. अनेकवेळा अपमानाचे दु:ख पचवावे लागले. सर्व संकटांना आणि दु:खाना शांतपणे सामोरे जाऊन निवृत्तिनाथ हा चित्सूर्य ज्ञानदेवादी भावंडांच्या जीवनात उगवला, त्यामुळे या भावंडांची जीवने उजळून निघाली. वर्षामागून वर्षे निघून जात आहेत तरीही या भावंडांची जीवने आणि हा चित्सूर्य अधिक प्रखरतेने प्रकाशत आहे.

## समारोप --

ज्ञानेश्वरीमध्ये ज्ञानदेवांचे आणि श्रीगुरू निवृत्तिनाथांचे व्यक्तिचित्रे साकारलेली आहेत. मूळ गीतेमध्ये ही व्यक्तिचित्रे नाहीत. ज्ञानदेवांची ही नवनिर्मिती आहे. नवनिर्मिती असूनही गीतार्थ कथनाशी एकरूप आहे. ज्ञानदेवातील कृष्णार्जुन जोडीशी या जोडीचे साधर्म्य जुळते. श्रीकृष्ण हे परब्रह्मच आहेत व श्रीनिवृत्तिनाथ हेही परब्रह्मच आहेत. अर्जुनाने आपले सर्वस्व श्रीकृष्णाला मानलेले आहे. ज्ञानदेवानी आपल्या कर्तृत्वाचे श्रेय आणि सर्वस्व निवृत्तिनाथाना अर्पण केलेले आहे. निवृत्तिनाथाची आपल्या शिष्याला आत्मबोध करुन अंत:करण उजळून टाकले. श्रीकृष्णानीही अर्जुनास

आत्मबोध करुन ज्ञानी केला. ज्ञानदेव व अर्जुन यांच्या नम्रतेच्या पातळीत किंचितमरही फरक पडत नाही.

ज्ञानदेवांच्या सुसंस्कृत व्यक्तिमत्वाचे दर्शन ज्ञानदेवीत होते. ज्ञानदेवांच्या या सुसंस्कृत व्यक्तिमत्वामुळे ज्ञानदेवीतील विविध विषयांना रेखीव व चिरंतन स्वरूप प्राप्त झालेले आहे. ज्ञानदेवांच्या कवीप्रकृतीमुळे ज्ञानदेवीत काव्यात्मकता अवतरलेली आहे. आदर्श शिक्षक व आदर्श विद्यार्थी यांचा वस्तुपाठ म्हणजे ज्ञानदेवांचे व्यक्तिचित्र,ज्ञानदेवांचा तत्वज्ञकवी असा उल्लेख करतात.गीतेतील तत्वज्ञान व्यक्तिचित्रणाच्या सहाय्याने समजावून सांगण्याचा ज्ञानदेवानी प्रयत्न केलेला आहे. त्या व्यक्तिरेखांच्या परस्पर संबंधात प्रतिमेचे रंग भरल्याने काव्यनिर्मिती झालेली आहे. ज्ञानदेवाच्या व्यक्तिरेखेत व्यासंग, बहुश्रुतता,शालीनतता,व्यासांविषयी व गीतेविषयीचा आदरभाव,गुरूविश्वास, अभिजात नम्रता,मराठी भाषाप्रेम इत्यादिचे दर्शन घडते.

आपल्या भावंडांच्या जीवनात ज्ञानाचा सुकाळु करणाऱ्या श्रीनिवृत्तिनाथाची व्यक्तिरेखा अलौकिक आहे. निवृत्तिनाथाचे प्रचंड अध्यात्मसामर्थ्य ,एक अधिकारी पुरूष, मूळ विषयावर लक्ष केन्द्रित करणारे, आपल्या शिष्यावर आईसमान प्रेम करुन शिष्याच्या जीवनात चित्सूर्य म्हणून तळपत राहणारे परब्रह्मस्वरूप गुरू म्हणून त्याचे व्यक्तिचित्र चित्रित झालेले आहे.

## संदर्भ

१ डॉ.फडकुले निर्मलकुमार - "ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी", मधील ज्ञानेश्वरीतील ज्ञानेश्वर" हा लेख , प्रथमावृत्ती,१९९१, पृ.१६२ .

२ जोशी सु.का." ज्ञानेश्वर त्रैमासिक,संतनिवृत्तिनाथ विशेषांक",मधील "ज्ञानेश्वरीतील गुरू शिष्य श्री निवृत्ति-ज्ञानदेव" हा लेख, फेब्रुवारी,१९७४,पृ.५१

३ --- तत्रैव -- पृ.३५

४ --- तत्रैव -- पृ.४६-४७ .